सामना पा.नं.५.

# भाईंदरच्या शिवजयंती उत्सवात अश्लील नृत्य आणि गाणी

**▪ मिंधे गटाचा 'प्रताप' ▪ शिवप्रेमींत संतापाची लाट**

भाईंदर, दि. ३० (सा.वा.) - छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती उत्सवात मिंधे गटाने सांस्कृतिक कार्यक्रमाच्या नावाखाली आयोजित केलेल्या सोहळ्यात चक्क अश्लील गाणी आणि नृत्याचा कार्यक्रम ठेवल्याची बाब उघडकीस आली आहे. या कार्यक्रमाची क्लिप समाजमाध्यमांमधून फिरल्यानंतर शिवप्रेमींमध्ये प्रचंड संताप पसरला आहे. बॅनरवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मिंधे गटाचे आमदार प्रताप सरनाईक यांचे मोठे फोटो लावण्यात आल्याने या कार्यक्रमाच्या माध्यमातून मिंधे गटाचा प्रचार करण्यात आल्याचे स्पष्ट झाले असल्याने त्यांच्याविरोधात आचारसंहिता भंगाचा गुन्हा आणि छत्रपती शिवरायांचा अवमान केल्याचा गुन्हा दाखल करा, अशी मागणी शिवसेना व मराठी एकीकरण समितीने केली आहे.

मीरा-भाईंदर शहरात तिथीप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती सर्वत्र साजरी करण्यात आली. काशिमीरा येथे धर्मवीर आनंद दिघे प्रतिष्ठान या संस्थेच्या नावाने परवानगी घेऊन मिंधे गटाचे पदाधिकारी रामभुवन शर्मा व त्यांच्या इतर कार्यकर्त्यांनी शिवजयंतीचे आयोजन केले. एक दिवसाची परवानगी घेऊन त्यांनी दोन दिवस हा कार्यक्रम केला. शुक्रवारी रात्री गाण्याचा व जेवणाचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता. यावेळी स्टेजवर झालेल्या गाण्याच्या कार्यक्रमात महिला नृत्यांगनांनी गाणी गात अश्लील नृत्य केले.



**क्लिप सोशल मीडियावर व्हायरल**

ही क्लिप समाजमाध्यमांवरून फिरताच मिंधे गटाविरोधात शिवप्रेमींनी प्रचंड संताप व्यक्त केला. सांस्कृतिक कार्यक्रमाच्या नावाखाली असली थिल्लरगिरी करून छत्रपती शिवरायांचा अवमान का करता, असा सवाल त्यांनी केला. याविरोधात काशिगाव पोलीस ठाण्यात विविध पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

---

पुण्यनगरी ५-पा-१.

# देहविक्रय : महिला दलालास अटक, पीडितांची सुटका

**▪ मीरा रोड** : मीरा-भाईंदर परिसरात देहविक्रयासाठी अल्पवयीन मुली पुरवणाऱ्या महिला दलालाला अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष- भाईंदर पथकाने छापा टाकून अटक केली आहे. तिच्या तावडीतून एक अल्पवयीन व दोन प्रौढ पीडितांची सुटका केली आहे.

मीरा-भाईंदर व इतर ठिकाणी दलाल महिला नगमा खान देहविक्रय व्यवसाय करते. ती व्हॉटसअॅपव्दारे गिऱ्हाईकांना अल्पवयीन व प्रौढ मुलींचे फोटो पाठवते. देहविक्रयासाठी अल्पवयीन व प्रौढ मुली पुरवत असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथकाला मिळाली. त्यानुसार बोगस गिऱ्हाईक व दोन पंच बोलावून दलाल महिला नगमा उर्फ जसप्रित उर्फ नीलम सांशी हिने सांगितल्याप्रमाणे अॅक्या फॅमिली रेस्ट्रो बार, निरा कॉम्पलेक्स, न्यू गोल्डन नेस्ट, भाईंदर पूर्व येथे छापा टाकला.

छाप्यात नगमा उर्फ जसप्रित उर्फ नीलम सांशी (२६) वर्षे हिने १ अल्पवयीन मुलगी व दोन प्रौढ मुलींना गिऱ्हाईकाकडे घेऊन आल्याचे समजले. तिला रोख रक्कम व इतर मुद्देमालसह ताब्यात घेण्यात आले. तिने आणलेल्या पीडितांची सुटका करण्यात आली. नगमा उर्फ जसप्रित उर्फ नीलम सांशी हिच्याविरोधात नवघर पोलीस ठाण्यात विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

CamScanner

लोकमत ५-५-३०

# शिवजयंतीच्या कार्यक्रमात अश्लील नाचगाणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** धर्मवीर आनंद दिघे प्रतिष्ठानच्या नावाने परवानगी घेऊन काशीमीराच्या धर्मवीर आनंद दिघे चौकात शिंदेसेनेच्या वतीने शिवजयंतीनिमित्त शुक्रवारी कार्यक्रम आयोजिला होता. या कार्यक्रमात पदाधिकारी रामभवन शर्मा यांनी भोजपुरी अश्लील गाणी व नाच असा कार्यक्रम आयोजित केल्यामुळे त्यांच्यावर टीकेची झोड उठली आहे.

शिंदेसेनेचे पदाधिकारी रामभवन शर्मा, ॲड. बाबासाहेब बंडे, कमलाकर पाटील, शिवाजी पानमंद आदींनी प्रतिष्ठानच्या माध्यमातून शिवाजी महाराज यांच्या जयंतीच्या दिवशी शुक्रवारी रात्री कार्यक्रम आयोजिला होता. यात अश्लील गाणी व त्यावर हावभाव करत नाच केले. याबाबत मराठी एकीकरण समितीचे सचिन घरत, मनसेचे श्रेयस सावंत, उद्धवसेनेचे लक्ष्मण जंगम, भाजप माजी नगरसेवक अनिल भोसले आदींनी संताप व्यक्त करून शिवाजी महाराजांबद्दल आदर नसणाऱ्यांवर गुन्हा दाखल करावा अशी मागणीही केली आहे.

# मर्डरची धमकी; महिलेचे शेजाऱ्यांवर चाकूने वार

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरारोडच्या पेणकरपाडा येथील दरवेश म्हाडा इमारतीत जुही खातून फिरोज (२२) या पती मोहम्मद सोनू (३४) आणि २ वर्षांचा मुलगा शिश आलम हे राहतात. शिश हा झोपेतून उठून घराबाहेर जाऊन रडत असताना शेजारी राहणाऱ्या अमीना खातून व तिची मुलगी आलिया यांनी मागील भांडणाचा राग धरून मुलाला आत घेऊन जा, नाहीतर तुमचा मर्डर करू, अशी धमकी जुही यांना दिली.

जुही यांनी देखील बघते कसा मर्डर करणार, असे प्रतिउत्तर केले असता आलिया हिने घरातून चाकू आणून जुही हिच्यावर चाकूने वार करत जखमी केले. जुहीचा पती हा पत्नीला सोडवण्यासाठी धावून आला असता अमीना हिने त्याच्या कान, मानेवर वार केले. पत्नी व पतीस चाकूने मारून जखमी केल्याप्रकरणी काशीमीरा पोलिसांनी अमीना खातून व आलियाविरुद्ध गुन्हा दाखल केला. अमीना हिला अटक केली आहे.

# वीजचोराने केली मारहाण

लोकमत न्यूज नेटवर्क

**कुडूस :** विद्युत सहायकाला एका ग्राहकाच्या तक्रारीचे निवारण करताना अनधिकृत वीज वापराचा आकडा आढळला. आकडा काढताच वीजचोराने त्या विद्युत सहायकाला मारहाण केल्याची घटना कोटाची जांभिवली येथे शुक्रवारी घडली.

सविता भोईर यांच्या ऑनलाइन तक्रारीचे निवारण करताना लाइनवर अनधिकृत आकडा आढळला. त्यांनी तो काढला. अंकुश व त्यांची पत्नी आणि शेजारी ऋतिक मदन साळवी यांनी विद्युत सहायक वैभव माळी यांची कॉलर पकडून मारहाण केली. पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

लोकमत ५-५-२०



उत्तन येथील धावगी डोंगरावर असलेल्या पालिकेच्या डम्पिंगला शनिवारी पुन्हा आग लागली. अग्निशमन दलाचे अधिकारी, जवानांनी ७ अग्निशामक यंत्रे व ६ पाण्याच्या टँकरद्वारे आग विझवण्यासाठी प्रयत्न केले.

# धावगी डोंगरावर डम्पिंगला आग; धुराचे पसरले लोट

## अग्निशमन दलाकडून प्रयत्न : सहा पाण्याच्या टँकरचा वापर

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरारोड :** उत्तन येथील धावगी डोंगरावर असलेल्या महापालिकेच्या डम्पिंगला आगीचे सत्र सुरूच आहे. शनिवारी पुन्हा येथील कचऱ्याला आग लागली. यामुळे परिसरात सर्वत्र घातक विषारी धुराचे लोट पसरले होते.

शनिवारी दुपारी पावणेदोनच्या सुमारास ही आग लागली. अग्निशमन दलाचे प्रमुख प्रकाश बोराडेसह २ अग्निशमन अधिकारी व सुमारे ३४ जवानांनी ७ अग्निशामक यंत्रे व ६ पाण्याच्या टँकरद्वारे आग विझवण्यासाठी प्रयत्न केले. यामुळे मोठी आग आटोक्यात आली असली, तरी रात्री उशिरापर्यंत आग धुमसत होती. त्यातून धुराचे लोट परिसरात पसरले होते. पुढील दोन दिवस या त्रासाला नागरिकांना सामोरे जावे लागणार आहे.

आगीच्या घटना वारंवार घडत असून हा त्रास किती सहन करायचा, असा संताप येथील ग्रामस्थ व्यक्त करीत आहेत.

### प्रदूषणामुळे नागरिकांना श्वसनाचे आजार

- या डम्पिंगला वारंवार आग लागत आहे. आग लागली की पुढील काही दिवस परिसर काळवंडत आहे.
- **प्रदूषण पसरून नागरिकांना श्वास घेण्यास त्रास होणे, खोकला यांसारख्या विविध आजारांना सामोरे जावे लागत आहे.**
- पर्यावरणाचीही मोठी हानी होत आहे. मात्र, आगी रोखण्यात प्रशासन अपयशी ठरत आहे.

CamScanner

लोकमत पु. पा. ३.

# रुग्णाची लूट? मनसेचा हॉस्पिटलमध्ये राडा

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** वसईच्या कार्डिनल ग्रेसियस मेमोरियल हॉस्पिटल ट्रस्ट येथे पेशंटची लूट व फसवणूक होत असल्याचा आरोप करीत मनसेच्या ठाणे, पालघर जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव यांनी कार्यकर्त्यांसोबत जाऊन तेथील अधिकाऱ्यांना जाब विचारत राडा घातला, तर कोणाचीही लूट होत नसल्याचे हॉस्पिटलचे विश्वस्त रोहन घोन्सालविस यांनी 'लोकमत'ला सांगितले.

वसईत राहणारे गिरीश पाठक यांना २० मार्चला कार्डिनल ग्रेशियस मेमोरियल हॉस्पिटलमध्ये दाखल केले होते. डॉ. राजीव शर्मा यांनी तपासाअंती त्यांना तीन ब्लॉकेज असल्याने अँजिओप्लास्टी करावी लागेल आणि तीन लाख रुपये खर्च येणार असल्याचे सांगितले. गिरीश यांची अँजिओप्लास्टी करून दोन ब्लॉकेज काढले व एक ब्लॉकेज औषधांनी निघून जाईल असे डॉक्टरांनी सांगितले. नंतर दोन दिवसांनी डॉक्टरांनी औषधाने तो ब्लॉकेज गेला नसून त्यासाठी पुन्हा अँजिओप्लास्टी करावी लागेल व खर्च येणार असल्याचे सांगितले.

तीन दिवसांत दोन वेळा अँजिओप्लास्टी करून सहा लाखांचे बिल का घेतले? एकाच वेळी न करता दोन लाखांचा भुर्दंड पेशंटला का? दोन लाख रुपये परत करावे, अशी मागणी करीत जाधव यांनी कार्यकर्त्यांसोबत जाऊन शुक्रवारी राडा घातला. याबाबत त्यांनी जिल्हा शल्य चिकित्सक, पालघर यांना तक्रार अर्ज करून आठ दिवसांत चौकशी करून अहवाल देण्याची मागणी केली आहे. नाहीतर मनसे स्टाइलने आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.



## पाच सदस्यांची समिती स्थापन

- पालघरचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. रामदास तडस यांनी शनिवारी डॉ. सचिन वाघमारे, डॉ. नाथा दुटे, डॉ. दिनेश गिरी, स्नेहल गिंभल, ॲड. सीमा साठे या पाच सदस्यांची समिती स्थापन केली आहे.
- **उपरोक्त समितीने २ एप्रिलला कार्डिनल ग्रेसियस मेमोरियल हॉस्पिटल (ट्रस्ट), वसई येथे भेट देऊन चौकशी करून अहवाल त्वरित सादर करण्याचे आदेश दिलेत.**

## हॉस्पिटल कोणत्याही चौकशीसाठी तयार

पेशंटची दोन वेळा अँजिओप्लास्टी करून पहिल्या वेळेस एक व दुसऱ्या वेळेस १ असे दोन स्टेंट टाकले आहेत. कोणत्याही प्रकारची लूट किंवा फसवणूक हॉस्पिटलने केलेली नाही. रिपोर्ट्स नातेवाइकांना दाखविले. या संदर्भातल्या कोणत्याही चौकशीला हॉस्पिटल तयार आहे. हॉस्पिटलला कोणतीही सरकारी सुविधा मिळत नसून जागा हॉस्पिटलने विकत घेतली. घरपट्टी, पाणीपट्टीही भरली जाते. राज्य सरकारच्या एका रुपयांची मदत हॉस्पिटलला येत नाही.

**- रोहन घोन्सालविस, विश्वस्त**



प्रवासी प्रतिभा निकम यांना एसटीमध्ये विसरलेली किमती ऐवज असलेली पर्स परत करताना वाहक आर. एम. शेख व चालक एन. के. मेश्राम.

# प्रवाशाचे अडीच तोळे दागिने, रक्कम केली परत

## एसटी चालक-वाहकांचा प्रामाणिकपणा

लोकमत न्यूज नेटवर्क

**विरार :** कऱ्हाड ते रबाळे पोलिस ठाण्यादरम्यान एसटी बसमधून प्रवास करताना एका महिला प्रवाशाची पर्स बसमध्येच राहिली होती. पर्समध्ये लाखोंचे दागिने आणि रोख रक्कम होती. मात्र, बसवाहक आणि चालकाने प्रामाणिकपणे त्या महिलेला तिची पर्स संपूर्ण ऐवजासह परत केली आहे. प्रवासी महिलेने चालक-वाहकांचे आभार मानले असून, त्या दोघांचाही नालासोपारा आगार व्यवस्थापकांनी सत्कार केला. त्यांच्या प्रामाणिकपणाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

नालासोपारा आगाराची बस क्रमांक ८६४७ ही कोल्हापूरवरून नालासोपारा स्थानकाकडे येत होती. यावेळी प्रतिभा निकम (रा. रबाळे) या रबाळे येथे उतरल्या. त्या आपली पर्स एसटीतच विसरल्या. पर्समध्ये अडीच तोळे सोने, रोख रक्कम व मोबाइल होता.

## आगार व्यवस्थापकांनी केला सत्कार

**१** ही बाब लक्षात आल्यावर त्यांनी मोबाइलवर फोन केला. एका प्रवाशाने ती पर्स वाहक आर. एम. शेख यांच्याकडे दिली. वाहक यांनी ती बाब वाहकचालक एन. के. मेश्राम यांनाही सांगितली.

**२** प्रतिभा निकम यांचे नातेवाईक एसटी महामंडळात कार्यरत होते. त्यांनी तत्काळ वाहनचालक व वाहक यांचा नंबर मिळवून संपर्क साधला. त्या दोघांनी आगारात पोहोचल्यावर ती पर्स जमा केली आणि प्रतिभा निकम या आल्यावर त्यांना सुपुर्द केली.

**३** वाहक-चालकांच्या प्रामाणिकपणाबद्दल नालासोपारा आगार व्यवस्थापक प्रज्ञा सानप-उगले व स्थानक प्रमुख पारधी यांनी सत्कार केला.

लोकमत पु.५-१.

# पाय ठेवले तिथे कचराच, दुर्गंधीमुळे नाकही मुठीत

## संतोषभवन परिसरात कचरागाडी न आल्याने संताप

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** कचऱ्याचे ढीग नाही तर संतोष भवन परिसरातील रस्त्यांवर जणू कचऱ्याचा पूरच आलेला पाहायला मिळत आहे. गेल्या सात दिवसांपासून या परिसरात महापालिकेची कचरा गाडीच आलेली नसल्याने कचरा उचलला गेलेला नाही. परिणामी येथील लोकांना दुर्गंधीचा त्रास सहन करावा लागत आहे. तसेच रस्त्यावरून चालायला जागा राहिली नसल्याने कचरा तुडवत किंवा त्यातून वाट काढत जावे लागत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

याबाबत स्थानिक नागरिक यांना विचारणा केल्यावर सांगितले की, कचरा उचलणारे येतात पण एका किंवा दुसऱ्या विभागातून कचऱ्याची गाडी भरली की, परत येतच नाही. त्यामुळे या परिसरात कचरा तसाच जमून राहिला आहे.



संतोषभवन परिसरातील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात कचरा साठलेला आहे.

### कुठे कुठे आहेत कचऱ्याचे ढीग?

नालासोपारा पूर्वेकडील संतोष भवन, गावराई पाडा, जीवन नगर, गौराई नाका, धानिवबाग, वाकणपाडा, नवजीवन, वालीव, धुमाळ नगर, सातीवली, भोयदापाडा तसेच विरार पूर्वेकडील चंदनसार, कातकरी पाडा, फुलपाडा, सहकार नगर कारगिल नगर, मोरेगाव, अलकापुरी अशा अनेक परिसरात कचऱ्याचे ढीग आजही पडून आहेत.

## वीजचोरावर गुन्हा

**नालासोपारा :** हनुमान नगर येथील ड्रीम प्लाझा जवळील फिश मेनिया येथे वीजचोरी दंडाचे वीज देयक भरले नाही. त्यांनी कंपनीची १ लाख ३३ हजार ६७० रुपयांची वीज चोरली आहे. महावितरणचे अक्षय भांडारकर यांनी शुक्रवारी नालासोपारा पोलिस ठाण्यात तक्रार देऊन गुन्हा दाखल केला आहे.

## पतीने केली पत्नीला गंभीर दुखापत

**नालासोपारा :** हनुमान नगरच्या साईराज अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या रामगोपाल आणि सिद्धी या पती-पत्नीमध्ये २७ मार्चला किरकोळ कारणावरून वाद झाला. रागाच्या भरात पतीने पत्नीला शिवीगाळ करून मारहाण केली. या मारहाणीत डाव्या पायाच्या तळव्याजवळ गंभीर दुखापत होऊन फ्रॅक्चर झाले आहे. नालासोपारा पोलिसांनी शुक्रवारी गुन्हा दाखल केला आहे.

## दुचाकीची धडक; बिबट्या जखमी

लोकमत न्यूज नेटवर्क

**पारोळ :** वसई किल्ल्याच्या परिसरात शुक्रवार २९ मार्च रोजी एका दुचाकीने बिबट्याला जोरदार धडक दिली. रात्री साधारण ८ वाजताच्या दरम्यान ही घटना घडल्याचा अंदाज आहे. या धडकेत जखमी बिबट्या तेथून पळून गेला. तसेच दुचाकीस्वारानेही तेथून धूम ठोकली.

गाडीची तुटलेली नंबरप्लेट घटनास्थळावरून वनविभागाच्या हाती लागली आहे. मांडवी वनपरिक्षेत्राने या परिसरात कॅमेरे लावले असून नागरिकांना सावध राहण्याचा इशारा दिला आहे.

अपघातग्रस्त बिबट्याही तेथून निघून गेल्यामुळे त्याचे रेस्क्यू किंवा त्यावर उपचार अद्याप करता आलेले नाहीत. तर, रेस्क्यूसाठी या बिबट्याचा शोध वनविभागामार्फत घेण्यात येत आहे. वनविभाग आणि वाइल्डलाइफ वेल्फेअर असोसिएशन संस्थेमार्फत या घटनेचा तपास करण्यात येत आहे.

CamScanner

लोकमत ५.४.१.

# बायकोला धडा शिकवायला कल्याण, दादर स्टेशन बॉम्बने उडवण्याची धमकी

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** सोडून गेलेल्या बायकोला धडा शिकवण्यासाठी एका आरोपी पतीने चक्क दादर, कल्याण रेल्वे स्थानक बॉम्बने उडवून देण्याची धमकी दिली. पेल्हार पोलिसांनी मात्र अवघ्या दोन तासांत आरोपीला शोधून त्याच्या मुसक्या आवळल्या आहेत.

शुक्रवारी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास पोलिस आयुक्तालयाच्या नियंत्रण कक्षावर एक निनावी दूरध्वनी आला होता. फोन करणाऱ्याने दादर आणि कल्याण रेल्वे स्थानक बॉम्बने उडवून देणार असल्याची धमकी दिली. यामुळे पोलिस यंत्रणा सतर्क झाली. हा फोन नालासोपारा परिसरातून आला होता.

त्यामुळे पेल्हार पोलिसांनी याचा तपास सुरू केला. वरिष्ठ पोलिस निरीक्षक जितेंद्र वनकोटी, पोलिस उपनिरीक्षक तुकाराम भोपळे यांनी रातोरात तांत्रिक विश्लेषण करून तपासाला सुरुवात केली. आरोपीचा मोबाइल क्रमांक बंद होता. पोलिसांनी या फोनची माहिती काढली असता ओम शिवसाई चाळ एवढाच पत्ता मिळत होता.

त्यामुळे पोलिसांच्या पथकाने रातोरात परिसरातील सर्व ओम शिवसाई नावाच्या चाळी पालथ्या घातल्या. दरम्यान, सीसीटीव्हीमध्ये एक संशयित पोलिसांना दिसला. त्यामुळे नालासोपाऱ्याच्या बिलालपाडा येथून पोलिसांनी त्याला अटक केली.

## दोन तासांत केली आरोपी पतीला अटक



आरोपी विकास शुक्ला (वय ३५) हा मजुरीचे काम करतो. दीड वर्षापूर्वी त्याची बायको त्याला सोडून कल्याण येथे राहायला गेली होती. ती कामानिमित्त कल्याण ते दादर असा प्रवास करत होती. त्यामुळे बायकोला धडा शिकवण्यासाठी त्याने कल्याण आणि दादर रेल्वे स्थानकावर बॉम्बने उडवून देण्याची धमकी दारूच्या नशेत दिल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

# पतीला धमकी; पत्नीवर गुन्हा




**मीरारोड :** भाईंदर पूर्वेच्या न्यू गोल्डन नेक्स्ट फेस १४ मधील सोनम सरोवर इमारतीत बनवारी सैनी (३९) हे राहतात. त्यांची पत्नी अनिता सैनी (३१) व त्यांच्यात घरगुती कारणावरून वाद आहेत. अनिता यांनी बनवारी यांना फोन करून छळवणुकीची केस टाकेन अशी धमकी दिली. तर डॉ. फय्याज आलम (४०, रा . बालाजी रुग्णालय, गोल्डन नेस्ट) यांनी मारण्याची धमकी दिली, अशी तक्रार बनवारी यांनी नवघर पोलिस ठाण्यात केली. त्या अनुषंगाने पोलिसांनी बनवारी यांची पत्नी अनिता व डॉ. फय्याज विरुद्ध अदखलपात्र गुन्हा नोंद केला आहे.

# जुन्या वादातून तरुणाला मारहाण

**मीरारोड :** भाईंदर पूर्वेच्या नवघर मार्गावर साईबाबा नगरमधील शनी महल इमारतीत अरमान आमिर शेख (२४) हे राहतात. ते तलाव रोड येथील उज्वल बुक डेपोजवळ असताना मागील किरकोळ वादाच्या रागातून उम्या आणि त्याच्या तीन साथीदारांनी शेख यांच्या तोंडावर हेल्मेट मारले. ठोश्याबुक्क्यांनी मारहाण करून शिवीगाळ व दमदाटी केली. याप्रकरणी २८ मार्च रोजी नवघर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पोलिस हवालदार निर्मळ हे तपास करत आहेत.

# आचोळेत हुक्का पार्लरवर कारवाई

**नालासोपारा :** आचोळे पोलिसांनी मराठा दरबार हॉटेल याठिकाणी सुरू असलेल्या हुक्का पार्लरवर शुक्रवारी संध्याकाळी कारवाई केली आहे. मॅनेजर शोएब शेख (२१) आणि वेटर महेशकुमार राम (२२) या दोघांनी पाच ग्राहकांना हुक्का पिण्यासाठी जागा उपलब्ध करून दिली आहे. पोलिसांनी हुक्का पॉट, फ्लेव्हर असा एकूण ४ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. आचोळे पोलिसांनी गुन्हा दाखल करून पुढील तपास करत आहेत.

# मोबाइल चोरट्यास अटक

**मीरा रोड :** मीरा रोडच्या रामदेवपार्क भागात टोकरी नावाच्या दुकानाचे शटर तोडून आतील १० हजार किमतीचा मोबाइल चोरट्याने चोरी करून नेल्याची घटना घडली. या प्रकरणी दुकान मालक सरोजिनी तळवणेकर यांच्या फिर्यादीवरून मीरा रोड पोलिसांनी २७ मार्च रोजी गुन्हा दाखल केला होता. पोलिसांनी गुन्ह्याचा तपास करीत दीपक लोकेश भूमी (२०, रा. गावदेवी चाळ, हनुमान मंदिर हवल, नवघर नाका) या चोरट्यास अटक केली आहे.

CS CamScanner

# मोबाईल शॉपीतून लाखोंचे मोबाईल चोरणाऱ्या चोरट्याला दिल्लीतून अटक



मीरा भाईंदर, दि. ३० (वार्ताहर) : मीरा भाईंदर वसई वेरार पोलीस आयुक्तालयातील ुन्हे शाखा युनिट १ च्या पथकाला ोबाईल चोरीचा पर्दाफाश करून एका चोरट्याला अटक करण्यात यश आले आहे. या पथकाने ोरट्याला दिल्लीतून अटक केली असून त्याच्याकडून १६ लाखांहून अधिक किमतीचे मौल्यवान ोबाईल जप्त केले आहेत. याच थकाने आणखी एका चोरट्याला ोरीच्या डंपरसह अटक केली आहे.

२१ मार्च २०२४ रोजी चिराग नगदीश, वय ३६, रा. C/६०४ ुकुंद कॉम्प्लेक्स, न्यू गोल्डन नेस्ट ोड, बनाना लिफ्ट हॉटेलच्या मागे, भाईंदर पूर्व यांनी भाईंदर पोलीस ठाण्यात चोरीची तक्रार दाखल केली होती. १६,७१,३००/- किमतीचा मोबाईल चोरीला गेल्याची तक्रार त्यांनी दिली होती. तक्रारीनंतर ादेशिक पोलिसांच्या पथकासह ुन्हे शाखा युनिट एकचे पथकही तपास करत होते. पीआय अविराज कुराडे यांच्या मार्गदर्शनाखाली यांच्या पथकाने घटनास्थळावरून मिळालेल्या सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे फिरोज उर्फ मोनू खान, रा. वांद्रे पश्चिम अ से चोरट्याची ओळख पटवली.

मात्र चोरीचा गुन्हा करून तो लाखोंचे मोबाईल घेऊन यूपीला पळून गेला. ही माहिती मिळताच संदीप शिंदे, अविनाश गर्जे, संजय शिंदे, संतोष लांडगे, पुष्पेंद्र थापा, सचिन हुले, सचिन सावंत, विजय गायकवाड, समीर यादव, सुधीर खोत, विकास राजपूत, प्रशांत विसपुते, सनी सूर्यवंशी यांचा समावेश असलेल्या पथकाने कारवाई केली. इत्यादी दिल्लीला रवाना झाले. आणि मोबाईल नंबरचे लोकेशन ट्रेस केल्यानंतर तो यूपीमधील वेगवेगळ्या ठिकाणाहून त्याचे लोकेशन बदलत राहिला, कारण त्याला पोलिस त्याच्या मागावर असल्याची कल्पना होती. त्यामुळेच तो दिल्लीला पळून गेला. दिल्लीत पळून जाताना त्याने चोरीचे मोबाईल त्याच्या ओळखीच्या कोणाकडे लपवून ठेवले. असे असतानाही गुन्हे शाखा युनिट १ च्या पथकाने त्या ठिकाणी पाठलाग करून चोरट्याला दिल्लीतून पकडले. अटक आरोपी फिरोज उर्फ मोनू नईम खान, वय २९ वर्षे, मूळ गाव अकबराबाद, तहसील नजीबाबाद, बिजनौर, राज्य उत्तर प्रदेश याच्याकडून २२ मोबाईल जप्त करण्यात आले असून, त्यांची किंमत १६ लाखांहून अधिक असल्याचा अंदाज आहे.

अशाप्रकारे आणखी एक चोरी उघडकीस आली असून एका वाहन चोराला डंपरसह अटक करण्यात आली आहे. फिर्यादी, सुरेश त्र्यंबक मंजूरकर, वय ३४, डंप ट्रक चालक यांनी त्यांचे वाहन भोलानगर जवळ उत्तन भाईंदर पश्चिम येथे उभे केले. ते वाहन अज्ञात चोरट्याने डुप्लिकेट चावीच्या साहाय्याने चोरून नेले. याप्रकरणी पथकाने केलेल्या तपासात डंपर चोरणाऱ्या चालकाचा अपघात झाल्याचे समोर आले असून त्याला परभणी येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

माहिती मिळताच पोलीस पथकाने चंद्रकांत गणपतराव जाधव वय ६७ रा. त्याच्याकडून संघ डंपर क्रमांक MH/०४/CU/९९०७ देखील जप्त करण्यात आला आहे.

CS CamScanner

# दादर और कल्याण रेलवे स्टेशन को उड़ाने की धमकी देने वाला गिरफ्तार

जागरण प्र. | संवाददाता

## पकड़े जाने के बाद आरोपी का बयान, 'पत्नी से बदला लेने के लिए किया फोन

**नालासोपारा।** पेल्हार पुलिस ने एक ऐसे व्यक्ति को गिरफ्तार किया है जो 112 नंबर कंट्रोल रूम मीरा भायंदर वसई विरार पुलिस आयुक्तालय में फोन करके दादर, कल्याण रेल्वे स्टेशन को बम से उड़ाने की धमकी दिया था। पुलिस ने इस काल गंभीरता से लेते हुए जांच करना चालू किया तो जिस फोन से फोन आया था वह फोन बंद बता रहा था। पुलिस ने टेक्निकल जांच, मुखबिरों की सूचना में पता चला कि जिस व्यक्ति ने फोन किया है वह पेल्हार पुलिस स्टेशन अंतर्गत धनोठा पाड़ा ओम साई चाल में रूम नंबर 5 में रहता है पुलिस ने भादंविस 505 (1)(ब)505 (2) 182 के तहत शिकायत दर्ज करके फोन करने वाले आरोपी विकास उमाशंकर शुक्ला को गिरफ्तार करके आगे की जांच पुलिस कर रही है। वहीं पुलिस ने फेक काल करने वाले व्यक्ति की जांच कर रही है की इसके पहले इसके ऊपर किसी तरह का गुनाह दर्ज है

CamScanner

1997 से

KAT खबरें आज तक

not a publication of the living media india group

वर्ष: 27 अंक-280 मुंबई, शनिवार 30 मार्च 2024 पृष्ठ-12 मूल्य :2.00

# व्यक्ति की हत्या के बाद फरार था मुख्य अभियुक्त, पेल्हार पुलिस ने जौनपुर से धर दबोचा

## 3 अभियुक्त को पुणे से गिरफ्तार किया जा चुका है

**वसई:** पेल्हार पुलिस स्टेशन की अपराध जांच शाखा ने हत्या के अपराध में फरार चल रहे मुख्य अभियुक्त को उत्तर प्रदेश राज्य से गिरफ्तार करने में सफलता हासिल की है। यह कार्रवाई डीसीपी (परिमंडल) जयंत बजबले व एसीपी बजरंग देसाई के मार्गदर्शन में पेल्हार थाने के (वरिष्ठ पुलिस निरीक्षक) जितेंद्र चनकोटी व पुलिस निरीक्षक (अपराध) कुमारगौरव धादवड के नेतृत्व में अपराध जांच शाखा के सहायक पुलिस निरीक्षक सोपान पाटील व पोउपनिरी तुकाराम भोपले की टीम ने की है।

पुलिस अधिकारी ने कहा कि,12 जनवरी 2024 को रात्रि 00.30 के आसपास माँ दुर्गा माता मंदिर के पास,विशाल पांडेनगर व हमीद कम्पाऊंड गौराईपाडा संतोषभवन, नालासोपारा पूर्व में अभियुक्त रोहन सिंह,मर्दा (पूरा नाम पता अज्ञात), पीली टी-शर्ट और जींस पैंट पहने व्यक्ति और उसके साथ 6/7 व्यक्ति (पूरा नाम पता अज्ञात) द्वारा मृतक सुधीर कुंजबिहारी सिंह उम्र 27 वर्ष,(निवासी-मारुती चाल,हिन्दुस्थान नाका,कांदीवली पूर्व ) को जबरन रिक्शा में बिठाया गया,पीटा गया और धारदार हथियार से वार कर हत्या कर दी गई।इस संबंध में शिकायतकर्ता वैभव रमेश मिश्रा. निवासी संतोष भुवन,नालासोपारा पूर्व द्वारा शिकायत दर्ज करायी गयी,जिसमे पेल्हार पुलिस ने कलम 302, 364, 141, 143, 144, 147, 148, 149, 120 बी के तहत अपराध दर्ज किया था।पुलिस अधिकारी ने कहा कि,उक्त अपराध की गंभीरता को ध्यान में रखते हुए वरिष्ठ अधिकारियों ने पेल्हार पुलिस स्टेशन के अपराध जांच दस्ते के अधिकारी व कर्मचारियों को अभियुक्त की पतासाजी कर उन्हें अपराध में गिरफ्तार करने का आदेश दिया।




वरिष्ठ अधिकारियों के आदेश पर पेल्हार थाने के अपराध अनुसंधान दस्ते के अधिकारी-कर्मचारी ने तकनीकी जानकारी और सीसीटीवी फुटेज के आधार पर अभियुक्त (1).सुरज लल्लन चव्हाण उम्र 25 वर्ष,(2).साहिल तिलकु विश्वकर्मा उम्र 21 वर्ष ओर (3).अखिलेश सुनिल सिंह ऊर्फ अक्की उम्र 27 वर्ष,सभी सन्तोष भुवन नालासोपारा निवासी को सिंहगड,पुणे से 13 जनवरी को हिरासत में लेकर उपरोक्त अपराध में गिरफ्तार किया गया था।उक्त अपराध का मुख्य अभियुक्त राहुल पाल उर्फ मर्दा अपराध कारित करने के बाद से ही फरार था।पुलिस अधिकारी ने कहा कि,वरिष्ठ पुलिस निरीक्षक जितेंद्र वनकोटी ने उक्त अपराध के मुख्य अभियुक्त राहुल पाल उर्फ मर्दा की तलाश के आदेश दिये थे।उक्त आदेश के बाद थाना पेल्हार के अपराध जांच शाखा के अधिकारी/कर्मचारी द्वारा उक्त अपराध में फरार अभियुक्त के संबंध में तकनीकी जानकारी प्राप्त की गयी।चूंकि अभियुक्त के उत्तर प्रदेश राज्य में होने की संभावना है,पेल्हार पुलिस स्टेशन के अपराध जांच दस्ते के अधिकारी/कर्मचारी ने उक्त अभियुक्त की तलाश में उत्तर प्रदेश राज्य के जिला भादोई में गये,उत्तर प्रदेश के भादोई जिले के चौरीबाजार में अभियुक्त के बारे में अधिक जानकारी प्राप्त करके,पुष्टि हुई कि उक्त अभियुक्त उत्तर प्रदेश राज्य के जौनपुर के रामपुर में है,तदनुसार, पुलिस टीम ने तुरंत थाना रामपुर, जिला जौनपुर पुलिस की मदद से रात में साकरी गांव में आरोपी की तलाश की और जंगल में भागते समय उसका पीछा किया और उसे गिरफ्तार कर लिया।

CS CamScanner

दैनिक हिंदमाता मिरर पैनी नजर, पुख्ता खबर

ठाणे, शनिवार 30 मार्च, 2024

ठाणे PLUS

# सुधीर कुंजबिहारी सिंह हत्याकांड का मुख्य आरोपी यूपी से गिरफ्तार

## • हत्या मामले में तीन आरोपी पहले ही हो चुके थे गिरफ्तार

**हिंदमाता संवाददाता @ नालासोपारा**

पेल्हार पुलिस स्टेशन की अपराध जांच शाखा ने हत्या के अपराध में फरार चल रहे मुख्य आरोपी को उत्तर प्रदेश राज्य से गिरफ्तार करने में सफलता हासिल की है। यह कार्रवाई डीसीपी (परिमंडल) जयंत बजबले व एसीपी बजरंग देसाई के मार्गदर्शन में पेल्हार थाने के (वरिष्ठ पुलिस निरीक्षक) जितेंद्र चनकोटी व पुलिस निरीक्षक (अपराध) कुमारगौरव धादवड के नेतृत्व में अपराध जांच शाखा के सहायक पुलिस निरीक्षक सोपान पाटील व पोउपनिरी तुकाराम भोपले की टीम ने की है।



### मृतक को जबरन रिक्शे में बैठाया

पुलिस अधिकारी ने कहा कि, 12 जनवरी को रात्रि 00.30 के आसपास मां दुर्गा माता मंदिर के पास, विशाल पांडेनगर व हमीद कम्पाऊंड गौराईपाडा संतोषभवन, नालासोपारा पूर्व में आरोपी राहुल पाल उर्फ मर्दा के साथ 6/7 व्यक्तिद्वारा मृतक सुधीर कुंजबिहारी सिंह उम्र 27 वर्ष,(निवासी- मारुती चाल,हिन्दुस्थान नाका,कांदीवली पूर्व) को जबरन रिक्शा में बैठकर अपने साथ ले गए और उसकी धारदार हथियार से वार कर हत्या कर दी गई। इस संबंध में शिकायतकर्ता वैभव रमेश मिश्रा, निवासी संतोष भुवन, नालासोपारा पूर्व द्वारा शिकायत दर्ज कराई गई,जिसमें पेल्हार पुलिस ने कलम 302, 364, 141, 143, 144, 147, 148, 149, 120 बी के तहत अपराध दर्ज किया था।

### सीसीटीवी फुटेज

पुलिस अधिकारी ने कहा कि, उक्त अपराध की गंभीरता को ध्यान में रखते हुए वरिष्ठ अधिकारियों ने पेल्हार पुलिस स्टेशन के अपराध जांच दस्ते को आरोपी को गिरफ्तार करने का आदेश दिया। वरिष्ठ अधिकारियों के आदेश पर पेल्हार थाने के अपराध अनुसंधान दस्ते के अधिकारी-कर्मचारी ने तकनीकी जानकारी और सीसीटीवी फुटेज के आधार पर आरोपी सुरज लल्लन चव्हाण उम्र 25 वर्ष, साहिल तिलकु विश्वकर्मा उम्र 21 वर्ष और अखिलेश सुनिल सिंह ऊर्फ अक्की उम्र 27 वर्ष, सभी सन्तोष भुवन नालासोपारा निवासी को सिहगड, पुणे से 13 जनवरी को गिरफ्तार किया गया था। उक्त अपराध का मुख्य आरोपी राहुल पाल उर्फ मर्दा अपराध करने के बाद से ही फरार था।

### जंगल में भागते समय धराया आरोपी

पुलिस अधिकारी ने कहा कि,वरिष्ठ पुलिस निरीक्षक जितेंद्र वनकोटी ने उक्त अपराध के मुख्य अभियुक्त राहुल पाल उर्फ मर्दा की तलाश के आदेश दिए थे। उक्त आदेश के बाद थाना पेल्हार के अपराध जांच शाखा के अधिकारी/कर्मचारी द्वारा उक्त अपराध मे फरार आरोपी के संबंध में तकनीकी जानकारी प्राप्त की गई। चूंकि आरोपी के उत्तर प्रदेश राज्य में होने की संभावना है, तो पेल्हार पुलिस स्टेशन ने आरोपी की तलाश में उत्तर प्रदेश के जिला भादोई मे गए और चौरीबाजार से आरोपी के बारे में अधिक जानकारी प्राप्त की। यहां से आरोपी के जौनपुर के रामपुर में होने की पुष्टि हुई। पुलिस टीम ने तुरंत रामपुर पुलिस की मदद से रात में साकरी गांव में आरोपी की तलाश की और जंगल में भागते समय उसका पीछा किया और उसे गिरफ्तार कर लिया।

---

महोत्सव

व
वसई द्वारा
वर्ष भी
से मनाया
ग उत्तरांचल
प्रसिद्ध
लोकगीत
महोत्सव
है। हाल
बैठक
श चन्द्र
रा जी व
परिस्थिति में

CamScanner